स्थावर मिळकतीच्या विक्री करिता ई-लिलावासाठी जाहीर सूचना

सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अँसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अँक्ट, २००२ (यानंतर अँक्ट) अंतर्गत **आयआयएफएल होम फायनान्स लिमिटेड** (पूर्वी इंडिया इन्फोलाईन हाऊसिंग फायनान्स लि. अशी ज्ञात) (आयआयएफएल-एचएफएल) **कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्र. ९८, उद्योग विहार, फेज-IV, गुरगाव - १२२०१५ (हरियाणा)** आणि **शाखा कार्यालय : सीटीएस क्र. ४२७८/१ ते ७, तानाजी नगर, कालिका माता मंदिर जवळ, २रा मजला, चिंचवड पुणे-४११०३३** येथे कडे गहाण स्थावर मिळकतीची विक्री. ज्याअर्थी आयआयएफएल-एचएफएल चा प्राधिकृत अधिकाऱ्यांनी (''एओ'') आयआयएफएल-एचएफएल ची थकबाकी वसूल करण्यासाठी **''जे आहे जेथे आहे तत्वाने आणि जे आहे जसे आहे तत्वाने''** तिच्या विक्रीच्या हक्कासह खालील कर्ज खाते/प्रॉस्पेक्ट क्र. मधील अँक्टच्या कलम १३(२) अंतर्गत जारी सूचनेला अनुसरून खालील मिळकत/तींचा कब्जा घेतला आहे. विक्री वेबसाईटः **www.bankeauctions.com** येथे पुरविलेल्या ई-लिलाव फ्लॅटफॉर्म मार्फत निम्नस्वाक्षरीकारांद्वारे करण्यात येईल.

कर्जदार/सह-कर्जदार/ हमीदारांचे नाव	मागणी सूचना तारीख आणि रक्कम	स्थावर मिळकत/ तारण मत्तेचे वर्णन	कब्जाची तारीख	राखीव किंमत
१. श्री. रामभाऊ पुंजाजी खाचणे २. सौ. सपना रामभाऊ खाचणे **(प्रॉस्पेक्ट क्र. आयएल१००४३००८)**	**३१-डिसेंबर-२०२१** रु. २१,९४,१५९/- (रुपये एकवीस लाख चौऱ्याण्णव हजार एकशे एकोणसाठ मात्र) **बोली वाढविण्याची रक्कम** रु. २५,०००/- (रुपये पंचवीस हजार मात्र)	फ्लॅट क्र. ४०८, ४था मजला, चटई क्षेत्र २४.९२ चौ.मीटर, बिल्डिंग डी, तनिश भक्ती, गट क्र. ४४४ आणि ४४५, नानाश्री लॉन्स, आळंदी रोड, पुणे, महाराष्ट्र, भारत, ४१२१०५ धारक मिळकतीचे सर्व भाग आणि विभाग.	**११ -मे-२०२२** **दिनांक: १६-मे- २०२२ रोजीस एकूण थकबाकी** रु. १९,०८,८३७/- (रुपये एकोणीस लाख आठ हजार आठशे सदतीस मात्र)	रु. १८,३९,८००/- (रुपये अठरा लाख एकोणचाळीस हजार आठशे मात्र) **इसारा अनामत रक्कम (इअर)** रु. १,८३,९८०/- (रुपये एक लाख त्र्याऐंशी हजार नऊशे ऐंशी मात्र)
१. श्री. विजय जगताप २. सौ. उषा विजय जगताप **(प्रॉस्पेक्ट क्र. आयएल१००८४९५८)**	**०६-डिसेंबर-२०२१** रु. ८,०४,८८६/- (रुपये आठ लाख चार हजार आठशे शहाऐंशी मात्र) **बोली वाढविण्याची रक्कम** रु. २५,०००/- (रुपये पंचवीस हजार मात्र)	सांगुर्डी, तालुका-खेड जिल्हा-पुणे-४१०५०६, गावातील गट क्र. २४४ वर बांधलेल्या ''कृष्णा कमल रेसिडेन्सी'' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील फ्लॅट क्र.-४०१, ४थ्या मजल्यावरील मिळकतीचे सर्व भाग आणि विभाग. महाराष्ट्र भारत ३४.८१० चौ. मीटर	**११-मे-२०२२** **दिनांक: १६-मे- २०२२ रोजीस एकूण थकबाकी** रु. ८,४३,९०९/- (रुपये आठ लाख त्रेचाळीस हजार नऊशे नऊ मात्र)	रु. १४,२३,४००/- (रुपये चौदा लाख तेवीस हजार चारशे मात्र) **इसारा अनामत रक्कम (इअर)** रु. १,४२,३४०/- (रुपये एक लाख बेचाळीस हजार तीनशे चाळीस मात्र)

मिळकतीच्या निरिक्षणाची तारीख	इअर अंतिम तारीख	ई-लिलावाची तारीख/वेळ
२७-जून-२०२२ स. ११.०० ते दु. १४.००	२९-जून-२०२२ ५.०० पर्यंत	०१ जुलै-२०२२ रोजी ११०० ते १३.०० पर्यंत

प्रदानाचे माध्यम : सर्व प्रदान हे गुरुग्राम येथे देय **'आयआयएफएल होम फायनान्स लिमिटेड'** च्या नावे डिमांड ड्राफ्ट द्वारे किंवा आरटीजीएस/एनईएफटी मार्फत करणे आवश्यक आहे. खात्याचा तपशील खालीलप्रमाणेः **ए) खात्याचे नाव : आयआयएफएल होम फायनान्स लि., बी) बँकेचे नावः स्टॅण्डर्ड चार्टर्ड बँक लि., सी) खाते क्र. ५३१०५०६६२९४, डी) आयएफएससी कोड : SCBL0036025 किंवा पेमेंट लिंकः https://quickpay.iiflfinance.com.**

अटी आणि शर्ती:-

१. ई-लिलावात सहभागी होण्याकरिता इच्छुक बोलीदारांनी पुरेशा आधी सेवा पुरवठादार **https://www.bankeauctions.com** कडे त्यांचा तपशील नोंदविणे आणि लॉगईन अकाऊंट, लॉगईन आयडी आणि पासवर्ड तयार करणे आवश्यक आहे. इच्छुक बोलीदारांनी वरील नमूद शाखा कार्यालयात इअरसाठी प्रदानाचा तपशील, केवायसी आणि पॅन कार्डच्या प्रतींसह त्यांचे ''निविदा प्रपत्र'' पाठविणे/सादर करणे आवश्यक आहे.
२. बोलीदारांनी रकाना बोली वाढविण्याची रक्कम मध्ये नमूद रकमेच्या पटीत त्यांचे प्रस्ताव वाढविणे आवश्यक आहे. जर बोली लिलावाच्या समाप्तीच्या वेळेच्या अंतिम ५ मिनिटांमध्ये केल्यास, समाप्तीचा वेळ आपोआप ५ मिनिटांकरिता विस्तारित होईल.
३. यशस्वी बोलीदारांनी एओ यांनी बोली मूल्य स्विकारल्यापासून २४ तासात (इअर समायोजित केल्यानंतर) बोली रकमेच्या २५% आणि बोली रकमेच्या उर्वरित ७५% तारण धनकोंनी विक्री निश्चित केल्याच्या तारखेपासून १५ दिवसांत जमा करणे आवश्यक आहे. सर्व जमा आणि प्रदान हे प्रदानाच्या विहित माध्यमाने करायचे आहे.
४. खरेदीदाराने सेस, प्रयोज्य मुद्रांक शुल्क आणि कोणतीही अन्य वैधानिक थकबाकी किंवा इतर थकबाकी जसे की पालिका कर, वीज प्रभार, जमीन आणि मिळकतीशी संबंधित सर्व कर आणि दरासह इतर अनुषांगिक खर्च, प्रभार भरायचे आहेत.
५. बोलीदारांना ई-लिलाव विक्री प्रक्रियेत भाग घेण्यासाठी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी लिलाव विक्री आणि लिलाव अर्जाच्या तपशिलवार अटी आणि शर्तींकरिता वेबसाईट **https://www.bankeauctions.com** आणि **https://www.iifl.com/home-loans/properties-for-auction** मार्फत जाण्याचा सल्ला देण्यात येत आहे.
६. तपशील, मदत प्रक्रिया आणि ई-लिलावावरील ऑनलाईन प्रशिक्षणाकरिता बोलीदार सेवा पुरवठादार **ई-मेल आयडी : support@bankeauctions.com सपोर्ट हेल्पलाईन नंबर : ७२९१९८११२४/२५/२६ यांना संपर्क करु शकतात आणि मिळकतीशी संबंधित चौकशीसाठी श्री. निलेश संगमनेरकर ९८९००५३०३५, ईमेल आयडी : nilesh.sangamnerkar@iifl.com** यांना संपर्क करू शकतात.
७. वरील सदर कर्जदारांना ७ दिवसांत प्रत्यक्ष कब्जा घेतेवेळी तारण मत्तेमध्ये असलेल्या घरगुती वस्तु घेवून जाण्यासाठी सूचना याद्वारे देण्यात येत आहे. अन्यथा आयआयएफएल-एचएफएल कोणत्याही परिस्थितीत मिळकतीच्या नुकसानीसाठी जबाबदार राहणार नाही.
८. पुढे कर्जदारांना याद्वारे सूचना देण्यात येते की, जर त्यांनी सदर वस्तु घेवून जाण्यास कसूर केली तर वरील सदर वस्तु कायद्यानुसार विकण्यात येतील.
९. वरील विहित वेळेत यशस्वी बोलीदार/लिलाव खरेदीदाराने कोणत्याही टप्प्यावर प्रदानात कसूर केली तर विक्री रद्द करण्यात येईल आणि अगोदर जमा केलेली रक्कम (इअर समाविष्टीत) जप्त करण्यात येईल आणि मिळकत पुन्हा विक्रीसाठी ठेवण्यात येईल.
१०. एओ यांनी कोणतेही कारण न देता निविदा/लिलावाच्या अटी आणि शर्ती बदलणे किंवा पुढे ढकलणे/रद्द करण्याचा हक्क राखून ठेवला आहे. निविदा/लिलावामध्ये कोणताही वाद झाल्यास आयआयएफएल-एचएफएलच्या एओचा निर्णय अंतिम राहील.

सरफैसी अँक्ट, २००२ च्या नियम ८(६) अन्वये ३० दिवसांची विक्री सूचना

कर्जदारांना निविदा/लिलावाच्या तारखेपूर्वी तारखेपर्यंत व्याज आणि अनुषांगिक खर्चासह वरील नमूद रक्कम चुकती करण्यासाठी याद्वारे सूचीत करण्यात येत आहे, कसूर केल्यास मिळकतीच्या लिलाव/विक्री करण्यात येईल आणि उर्वरित थकबाकी काही असल्यास व्याज आणि खर्चासह वसुल करण्यात येईल.

ठिकाणः पुणे, दिनांकः २४-मे-२०२२. सही/- प्राधिकृत अधिकारी, आयआयएफएल होम फायनान्स लिमिटेड

फॉर्म क्र. ५२ (विनियमन ६० (१२)

भारत सरकार,
मुंबई कर्जवसुली न्यायाधिरण क्र. १
एमटीएनएल भवन, २ रा मजला, स्ट्रँड रोड, अपोलो बंदर,
कुलाबा मार्केट, कुलाबा, मुंबई ४०० ००५.
वसुली अधिकाऱ्यांच्या समक्ष,
कर्जवसुली न्यायाधिकरण १, मुंबई
स्थावर मालमत्तेच्या जप्तीचे वॉरंट
वसुली प्रक्रिया क्र. ४६८/२०१६
मध्ये

एक्झि. क्र. १९
पुढील तारीख : ३०.०५.२०१२

स्टेट बँक ऑफ इंडिया ..... **कर्ज धारक**
वि.
मिट्टाटेक्स एक्सपोर्ट्स प्रा. लि. व अन्य ...... **न्याय ऋणको**

ज्याअर्थी तुम्ही सदर मुदत कर्ज खाते मिट्टाटेक्स एक्सपोर्ट्स प्रा. लि. व अन्य (प्रमाणपत्र धारक) यांच्या संबंधात सदर रक्कम **रु. ४०,५६,८१,४९६.००/- (रु. चाळीस करोड छपन्न लाख ऐक्याऐंशी हजार चारशे शहाण्णव मात्र)** या रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने त्यावरील व्याज व मूल्य यांची वसुली प्रमाणपत्र क्र. ४६८/२०१६ च्या संबंधातील मूळ अर्ज क्र. ११४/२०१३ यांच्या संबंधात सन्मा. पीठासन अधिकारी यांच्या द्वारे जारी प्रमाणपत्रांमधील रकमेचा भरणा करण्यास कसूर केली आहे.

तुम्हाला पुढील आदेश मिळेपर्यंत खालील निर्देशित मालमत्तेच्या संदर्भात हस्तांतरण, करार, तिसऱ्या पक्षाचे हित निर्माण करणे, ताब्यामध्ये हिस्सा, अधिकार वा व्यवहार करण्यास मनाई करण्यात येत आहे व अशा हस्तांतरण, करार, ताबा वा अधिकाराअंतर्गत कोणत्याही प्रकारचे लाभ घेण्यास सर्व व्यक्तींना मनाई करण्यात आली आहे.

मालमत्तेचे विनिर्देशन

स्टॉक्स, बुक डेब्ट्स, वर्क इन प्रोग्रेस, फिनीश्ड गुड्स, रिसीव्हेबल्स व अन्य जंगम मालमत्तांचे तारणगहाण. स्थावर मालमत्ता : १. फ्लॅट क्र. ३०१, मोजमापित ८७० चौ. फूट, ३ रा मजला, ए विंग, नोरवूड को-ऑप. हा. सोसायटी, लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०५३ हे अनुसूची-१ मध्ये विवरणीत असून न्याय ऋणको क्र. २ व ३ यांच्याद्वारे कर्ज धारक यांच्या नावे आहे, २. कार्यालय जागा दुकान क्र. ४, मोजमापित ४३० चौ. फूट तळ मजला, क्रॉसगेट, लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी पश्चिम, मुंबई ४०० ०५३ हे अनुसूची - १ मध्ये अधिक विवरणीत असून न्याय ऋणको क्र. ६ (एचयूएफ) द्वारे मालकीचे असून न्याय धारक यांच्या नावे आहे. ३. फ्लॅट क्र. बी-१२, मोजमापित ८०० चौ. फूट १ ला मजला, किंगस्टन को-ऑप. सोसयटी प्लाट क्र. ८७, क्रॉस रोड क्र. ४, श्री स्वामी समर्थ नगर, अंधेरी पश्चिम, मुंबई ४०० ०५३ येथील अनुसूची - १ मध्ये विवरणीत न्याय ऋणको क्र. ३ वरील कर्ज धारक यांच्या नावे आहे. ४. फ्लॅट क्र ए-१२, मोजमापित १०५० चौ. फूट, १ ला मजला, किंगस्टन को-ऑप. हा. सो. लि., प्लॉट क्र. ८७, क्रॉस रोड क्र. ४, श्री स्वामी समर्थ नगर, अंधेरी पश्चिम मुंबई ४०० ०५३ अनुसूची - १ मध्ये अधिक विवरणीत असून न्याय ऋणको क्र. २ व/वा न्याय ऋणको क्र. ६ (एचयूएफ) मधील मालकीचे कर्ज धारक यांच्या नावे.

माझी सही व सदर न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी दि. ०६ मे, २०२२ रोजी जारी.

शिक्का

सही/-
अशू कुमार
वसुली अधिकारी,
कर्जवसुली न्यायाधिकरण १, मुंबई

१. **मिट्टाटेक्स एक्सपोर्ट्स प्रा. लि. (न्याय ऋणको क्र. १)** (ए) मुख्य कार्यालय ४, क्रॉसगेट, लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०५३. व (बी) शाखा कार्यालय ८/९, कॉटन एक्सचेंज बिल्डींग, कॉटन ग्रीन (पू), मुंबई ४०० ०३३.
२. **यूरोएशीआ एन्टरप्रायजेस (न्याय ऋणको क्र. ६)** (प्रोप्रायटर श्री. कृष्णा कुमार मित्तल (एचयूएफ) ४ क्रॉसगेट, लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०० ०५३

सार्वजनिक सूचना

याद्वारे सूचना दिली जाते की **श्री सुरेश बाबुराम शर्मा,** शेअर प्रमाणपत्र क्र.१४१ अंतर्गत जारी केलेल्या विशिष्ट क्र. १४०१ ते १४१० असलेल्या प्रत्येकी रु. ५०/- च्या १० शेअर्सचे एकमेव आणि पूर्ण मालक असल्याचा दावा करत आहेत आणि फ्लॅट क्र.६०४, सी विंग, मापित ५९.४६ चौ. मी. ६४० चौ. फूट. ला समतुल्य कारपेट क्षेत्र, महालक्ष्मी टॉवर, न्यू डी.एन. नगर, अंधेरी (पश्चिम) येथील न्यू डी.एन. नगर सहकारी गृहनिर्माण संस्था युनियन लि. च्या कॅपीटल/मालमत्तेतील पुनर्वसन इमारतीच्या बी१-०१ मधील १ कार पार्किंगच्या जागेसह सहाव्या मजल्यावरील, मुंबई -४०००५३, धारक सी.टी.एस. क्र. १९५ जमिनीवर बांधलेले, गाव अंधेरी, तालुका अंधेरी, २७ मार्च २०१८ रोजी किंवा सुमारे अंमलात आणलेल्या कायमस्वरूपी पर्यायी निवास कराराद्वारे ते विकत घेतले आणि भाग एक वरील डी.एन.नगर को-ऑप. हाऊ. सोसायटी लि. आणि भाग दोन वरील मे. रुस्तमजी रियल्टी प्रा. लि. येथून अ.क्र.बीडीआर-१७-३१३९-२०१८ च्या अंतर्गत सब-रजिस्टार ऑफ अॅश्युरन्सकडे रीतसर नोंदणी केलेली आहे. सदर नवीन शेअर्स आणि फ्लॅट क्र.-६०४ **श्री. सुरेश बाबुराम शर्मा** यांना वाटप करण्यात आले. शेअर प्रमाणपत्र क्र. ४१४ अंतर्गत विशिष्ट क्र.२०६६ ते २०७० धारक जुन्या ५ शेअर्सच्या बदल्यात प्रत्येकी रु. ५०/- चे शेअर **सुरेश बाबुराम शर्मा** यांना जारी केले आणि जुना फ्लॅट धारक क्र.४७४, २११.३७ चौ. फूट. कार्पेट एरिया. सदर एम.आर. सुरेश बाबुराम शर्मा आता नवीन शेअर्स आणि फ्लॅट क्र.सी-६०४ आणि त्यावरील सर्व फायदे आणि विशेषाधिकार विकण्याचा, हस्तांतरित करण्याचा, अभिव्यक्त करण्याचा आणि नियुक्त करण्याचा आणि त्या फ्लॅटचा प्रत्यक्ष ताबा आमच्या ग्राहकांना आणि त्यांच्या नावे सुपूर्द करण्याचा मानस आहे. कोणतीही व्यक्ती/संस्थेने उपरोक्त नवीन शेअर्स आणि फ्लॅट आणि/किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या किंवा त्याच्या भागाच्या संदर्भात कोणतेही डीड, दस्तऐवज, लेखन केले आहे आणि/किंवा त्याच्या संदर्भात कोणतेही कृत्य किंवा कागदपत्रे अंमलात आणली आहेत आणि/किंवा कोणताही दावा किंवा आक्षेप विक्रीचा मार्ग, गहाण, ट्रस्ट, धारणाधिकार, ताबा, बक्षिस, वारसा, रिलीझ, भाडेपट्टा किंवा अन्यथा जे काहीही असेल ते, सदर सूचना जारी केल्याच्या तारखेपासून **१४ दिवसांच्या** आत कागदोपत्री पुराव्यासह आम्हाला कळवावे. अशा कोणत्याही व्यक्ती/संस्थेकडून, द्वारे, त्याच्यासाठी आणि/किंवा त्याच्या वतीने असे कोणतेही दावे किंवा मागणी, आक्षेप किंवा अडथळे, इत्यादी कोणत्याही प्रकारे विचारात घेतले जाणार नाहीत आणि आमच्या अशिलांना सांगितलेले नवीन शेअर्स आणि फ्लॅट आणि त्या फ्लॅटचा प्रत्यक्ष ताबा आणि त्यासोबत मूळ टायटल डीड आणि हस्तांतरण फॉर्म, त्यानुसार, विक्री कराराची अंमलबजावणी आणि नोंदणी करून मिळवण्याचा अधिकार असेल.

दिनांक २६ मे २०२२ रोजी **मे.ए.एन.एस लीगल सर्विस करीता,**
वकील,
डी/१०, पारले कॉलनी, सहकार मार्ग, विले पारले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७.

जाहीर सूचना

सूचना घ्यावी की माझे अशील ठाणे जिल्हा को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फेडरेशन लिमिटेड हे गाव ठाणे, ठाणे पश्चिम ठाणेचा टिक्का क्र. २ सीटीएस क्र. ३७७/बी/२ वर बांधलेल्या विलासिनी अशा ज्ञात इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील मोजमापित २५३ चौ. फू. चटई क्षेत्र (नवीन खोली क्र. १०१ मोजमापित २७८ चौ. फू. चटई) ओपन टेरेस आणि १४९ चौ. फू. चटई क्षेत्र असलेल्या एका खोलीचा परिसर क्र. ०८ चे विद्यमान मालक आहेत आणि त्यामुळे वरील सदर परिसराच्या संदर्भातील क्र. २९०६/१९९८ धारक ठाणे-१ येथील हमी उपनिबंधकांच्या कार्यालयात नोंदणीकृत हस्तांतरक म्हणून गुणवंत एकनाथ डहाळे आणि हस्तांतरिती म्हणून दि. ठाणे जिल्हा को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फेडरेशन लि. दरम्यान निष्पादित दिनांक ०९.०४.१९९८ रोजीचा मूळ विक्री करार त्यांच्या ताब्यात होता जो माझ्या अशिलांच्या ताब्यातुन हरवला आहे. माझा अशिलांनी दिनांक ०२.०५.२०२२ रोजीच्या लॉस्ट रिपोर्ट क्र. ५०१ सन २००२ अंतर्गत ठाणे नगर पोलिस स्टेशनमध्ये प्रकरण नोंदविले आहे.

जर कोणाला वरील सदर मूळ करार सापडला किंवा त्यावर कोणताही हक्क, नामाधिकार आणि हितसंबंध असल्यास सदर सूचना प्रसिद्धी तारखेपासून **१५ (पंधरा) दिवसांत** निम्नस्वाक्षरीकारांना संपर्क करावा. कसूर केल्यास सदर फ्लॉटच्या संदर्भात तेथे कोणाचाही दावा नसल्याचे गृहित धरण्यात येईल आणि दावा काही असल्यास त्यागित केल्याचे मानण्यात येईल.

सही/-
मे. चंदनशिव अँण्ड असोसिएटस्
श्री. महेश एच. चंदनशिव
वकील उच्च न्यायालय
युनिट क्र. १२-४७, २रा मजाला,
हावरे सेन्चुरियन कॉम्प्लेक्स,
प्लॉट क्र. ८८ ते ९१,
सेक्टर १९ ए, नेरुळ पूर्व,
नवी मुंबई ४००७०६,
मोबा. ८८७९३८८३३२
ईमेल : advmhchandanshiv@gmail.com
ठिकाण : ठाणे दिनांक : २५.०५.२०२२

जाहीर सूचना

आम जनतेस सूचना याद्वारे देण्यात येते की, माझे अशील १. श्री. कृणाल दिपक ठक्कर व २. श्रीम. अल्का दिपक ठक्कर हे इंडस्ट्रियल जागा धारक युनिट क्र. २०३, २ रा मजला, बिल्डींग रामगोपाल इंडस्ट्रियल इस्टेट ऑफ रामगोपाल इंडस्ट्रियल इस्टेट प्रीमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. म्हणून ज्ञात (नोंदणीकरण क्र. बीओएम/जीएनएल/टी/१७७६/वर्ष १९८१ दि. ०५.१०.१९८१) (यापुढे सदर सोसायटी म्हणून संदर्भित), डॉ. आर. पी. रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई ४०० ०८० (यापुढे सदर जागा म्हणून संदर्भित) मालमत्तेचे अधिकारी आहेत व पाच संपूर्ण प्रदानित शेअर्स रु. ५०/- प्रत्येकी सदर सोसयटीचे धारक विभिन्न क्र. ३०१ ते ३०५ (दोन्ही समाविष्ट) धारक शेअर प्रमाणपत्र क्र. ६१ (यापुढे सदर शेअर्स म्हणून संदर्भित) संदर्भातील मालक आहेत. सदर जागेच्या संबंधात दस्तावेजांची साखळी १. पहिले करार अर्थात विक्रीचे करार दि. ५ ऑक्टोबर, १९७९ हे मे. वीणा डेव्हलपर्स व मे. इंडो साईगाव एजन्सी दरम्यान अंमलात आणलेले करार २. दुसरे करार दि. ६ ऑक्टोबर, १९७९ जे मे. इंडो साईगाव एजन्सी व श्रीम. मंजुळा जितेंद्र शाह यांच्या दरम्यान अंमलात आणले होते, ३. तिसरे करार अर्थात विक्रीचे करार दि. ५ ऑक्टोबर, १९८१ जे श्रीम. मंजुळा जितेंद्र शाह यांच्या दरम्यान व १. श्री. गुळ फगवानी व २. श्रीम. सरोज मुळचंद मोटवानी यांच्या दरम्यान अंमलात आणलेले करार, ४. चौथे करार अर्थात विक्रीचे करार दि. १ एप्रिल, १९८७ जे १. श्री. गुल फगवानी व २. श्रीम. सरोज मुलचंद मोटवानी व श्रीम. हसमन महेष दोमादिया यांच्या दरम्यान अंमलात आणले होते. सदर श्रीम. हसमन महेष दोमादिया हे दि. १७ जानेवारी, २०१४ रोजी मयत झाले त्यांच्या मागे त्यांची अंतिम मुखत्यारपत्र व वहिवाट हे सदर जागेच्या संबंधात केले असून सदर मालमत्तेमध्ये तीन मुली अर्थात १. श्रीम. हेमाली केतन पारेख, २. श्रीम. पुजा जतिन सापानी व ३. श्रीम. भावना जितेन सापानी हे आहेत. प्रोबेट दि. २० मार्च, २०१५ रोजी मुंबई उच्च न्यायालय यांच्याकडून मुखत्यारपत्र प्राप्त करण्याकरिता. ५. पाचवे करार विक्रीचे करार दि. १५ एप्रिल, २०१५ रोजी १. श्रीम. हेमाली केतन पारेख, २. श्रीम. पुजा जतिन सापानी व ३. श्रीम. भावना जितेन सापानी यांच्याद्वारे अंमलात आणलेले आहेत. व १. श्री. कृणाल दिपक ठक्कर व २. श्रीम. अल्का दिपक ठक्कर हे माझे अशील आहेत. सदर मूळ दुसरे करार हे सदर जागेच्या संबंधात गहाळ/ हरवले आहेत व शोधूनही सापडत नाही आहेत. जर कोणाही व्यक्तीस/बँक/ वित्तीय संस्था सदर मूळ दुसरे करार ज्यांच्या ताब्यात आहेत त्यांनी सदर दुसरे मूळ करार सदर जागेच्या संबंधातील कोणत्याही भागाच्या संबंधात कोणतेही शेअर वा हितसंबंध असल्यास तसेच कोणतेही हक्क, अधिकार, हितसंबंध, दावे वा मागण्या असल्यास तसेच काही असल्यास तसेच अमर्यादित यांच्यासह सदर जागा वा कोणत्याही भागाच्या संबंधात विक्री, अदलाबदल, देणगी, भाडेकरार, लीव्ह अ‍ॅन्ड लायसंस, अधिकार, सुविधाधिकार, वहिवाट, जप्ती, अभिहस्तांकन, गहाण, वारसा, देणगी, जप्ती, भेट, धारणाधिकार, प्रभार, देखभाल, न्यास, मूळ हक्क करारांचा ताबा वा अडथळे काही असल्यास, कौटुंबिक करार/ सेटलमेंट, कोणत्याही न्यायालयाचे आदेश, हुकूम, कंत्राट, करार, विकास हक्क वा अन्य काही असल्यास त्यांनी याद्वारे अधोहस्ताक्षरितांना कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरूपात माझा खालील नमूद पत्त्यावर सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या सादर करावे अन्यथा सदर दावे वा मागण्या काही असल्यास त्या सदर मालमत्तेच्या संदर्भातील असल्यास त्या गृहित धरल्या जाणार नाही व सदर व्यक्तींचे काही असल्यास कोणत्याही इच्छा व हेतु अधित्यागीत व परित्यागीत मानले जातील व सर्व इच्छा व हेतु गृहित धरले जाणार नाहीत व सदर जागेचे हक्क हे स्पष्ट व बाजारमूल्य तसेच अडथळ्यांपासून मुक्त असल्याचे गृहित धरले जाईल.

मुंबई, दि. २६ मे, २०२२ **सही/-**
विकास ठक्कर
वकील उच्च न्यायालय
४०१/४०२, साईनाथ हाउस, बीपीएस क्रॉस रोड क्र. १,
शेरॉन स्कूलजवळ, मुलुंड (पश्चिम), मुंबई ४०० ०८०

इंडियन ओव्हरसीज बँक

अ‍ॅसेट रिकव्हरी मॅनेजमेंट ब्रांच,
रचना बिल्डिंग, ४ था मजला, राजेंद्र प्लेस, दिल्ली-११० ००८,
दूरध्वनी: ०११-२५७५८१२४, ई-मेल: iob1997@iob.in

(स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता (सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स च्या नियम ८(६) च्या परंतुकान्वये)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८(६) ची परंतुके सहवाचता सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अ‍ॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अन्वये स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

सर्वसाधारण जनता आणि विशेषत: कर्जदार आणि हमीदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, खालील वर्णिलेल्या स्थावर मिळकती या इंडियन ओव्हरसीज बँकेकडे गहाण/प्रभारित आहेत ज्यांचा कब्जा इंडियन ओव्हरसिज बँकेच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, त्या येथील खालील नमुद तपशिलांनुसार **''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे''** आणि **''जे काही आहे तेथे आहे''** तत्त्वाने विकण्यात येणार आहे.

अ. क्र.	कर्जदाराचे नाव / हमीदाराचे नाव	इंडियन ओव्हरसीज बँकेला येणे थकीत रक्कम	स्थावर मिळकतीचे वर्णन / काही असल्यास ज्ञात भार	कब्जाचा प्रकार	राखीव किंमत / इसारा अनामत रक्कम / बोली वाढ रक्कम	लिलावाची तारीख / बोली सादर करण्याची अंतिम तारीख	संपर्क व्यक्तीचे नाव आणि क्र.
१.	**१. श्री. कमलेश आरोन** (असोसिएटेड ट्रेड लॉजिस्टिक्स प्रा. लि. च्या खात्यातील हमीदार आणि गहाणवटदार) **२. श्रीमती शिखा आरोन** (असोसिएटेड ट्रेड लॉजिस्टिक्स प्रा. लि. च्या खात्यातील हमीदार) **श्री. कमलेश आरोन** **श्रीमती शिखा आरोन**	**३१.०७.२०१९ रोजीस मे. असोसिएटेड ट्रेड लॉजिस्टिक्स प्रा. लि. करिता** रु. ७,९८,३७,९१७/- सह पुढील व्याज आणि खर्च	ऑफिस क्र. २११, २१२ आणि २१३, दुसरा मजला, साई कमशिअल कॉम्प्लेक्स, गोवंडी स्टेशन रोड, गोवंडी (पूर्व), मुंबई-४०० ०८८. बिल्टअप एरिया = ११३७ चौ. फूट. मालक: **कमलेश आरोन** **(मिळकत बँकेच्या प्रत्यक्ष कब्जात आहे)** **(ई-बी-क्रय प्रॉपर्टी आयडी-IOBA1997GOVE2)** काही नाही	प्रत्यक्ष	**रु. १६३.७२ लाख** (प्रयोज्य टीडीएस सह) **रु. १६.३८ लाख** रु. २५,०००	१५.०६.२०२२ १४.०६.२०२२	**श्री. रविश कुमार ९३०४२६९८७७**

- जेथे जेथे लागू असेल तेथे तेथे राखीव किंमत आयकर अधिनियमाच्या कलम १९४ (।ए) अन्वये १% कर धरून आहे. *इअर सादर करणे पासून सुरु ३०.०५.२०२२
- याला प्राधान्य देण्यात येईल की, इच्छुक बोलीदारांनी एका बोलीच्या पटीत/वाढीसह राखीव किंमतीसह बोली सुरु करावी
- विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी इंडियन ओव्हरसीज बँकेच्या वेबसाईट वर दिलेल्या लिंक म्हणजेच **www.iob.in [https://www.iob.in/TenderDetails.aspx?Tendertype=E_Auction] किंवा https://ibapi.in** चा कृपया संदर्भ घ्यावा.
- उपरोल्लेखित तारखेस ई-लिलाव आयोजित करण्याबाबत सदर कर्जाच्या कर्जदार आणि जामीनदार यांना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६)/नियम ९(१) अन्वये दिलेली एक सूचना म्हणूनही हे समजावे.

ठिकाण : नवी दिल्ली **प्राधिकृत अधिकारी, इंडियन ओव्हरसीज बँक**

पिगासस अ‍ॅसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

PEGASUS
५५-५६, ५ वा मजला, फ्री प्रेस हाऊस, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
फोन क्र.: ०२२ - ६१८८ ४७००
ईमेल: sys@pegasus-arc.com युआरएल : www.pegasus-arc.com

ई-लिलाव विक्रीची जाहीर सूचना

सीक्युरिटायझेशन अ‍ॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अ‍ॅन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ सहवाचन सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (६) च्या तरतुदींअंतर्गत स्थावर मालमत्तांच्या विक्रीकरिता ई - लिलाव सूचना

तमाम जनतेस आणि विशेषत: कर्जदार व हमीदारांना याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, प्रतिभूत धनको अर्थात - पीगासस अ‍ॅसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड (पीगासस एआरसी) पीगासस ग्रूप थर्टी फोर ट्रस्ट १ चे ट्रस्टी म्हणून आपल्या क्षमतेत कार्यरत - खालील निर्देशित कर्जदारांच्या खालील निर्देशित प्रतिभूतीसंदर्भातील थकबाकींचे एनकेजीएसबी को-ऑपरेटिव्ह बँकेद्वारे सरफैसी कायद्याच्या तरतुदींअंतर्गत अभिहस्तांकन करार **दि. २६.०३.२०१९** अंतर्गत अभिहस्तांकित यांच्याकडे गहाण / प्रभारित आहे.

वरील अभिहस्तांकन कराराच्या अनुषंगाने पीगासस एआरसी - प्रतिभूत धनको यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी खालील निर्देशित मालमत्तांचा प्रत्यक्ष ताबा घेतला आहे व **मे. एआरके हॉनकोन लेजर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, श्री. राघव शामराव कुलकर्णी व श्रीमती आरती राघव कुलकर्णी यांच्याकडून दि. ३१.०५.२०१७** रोजीनुसार रक्कम **रु. १,९२,०९,५३७.५५ (रु. एक कोटी ब्याण्णव लाख नऊ हजार पाचशे सदतीस व पंचावन्न पैसे मात्र)** अधिक संबंधित विक्रीच्यातारखेपूर्वी कोणत्याही वेळी प्रदानाच्या वा वसुलीच्या तारखेपर्यंतचे कंत्राटी दराने व्याज अधिक मूल्य, प्रभार, खर्च रकमेच्या वसुलीकरिता दि. ०१.०७.२०२२ रोजीनुसार सर्व ज्ञात तसेच अज्ञात दायित्वांसहित जशी आहे जेथे आहे, जशी आहे जी आहे व जी काही आहे तेथे आहे तत्त्वावर सदर मालमत्तांची विक्री करण्यात येत आहे. राखीव मूल्य व इसारा रक्कम ठेव खालीलप्रमाणे आहेत :

कर्जदार / हमीदाराचे नाव :	**मे. एआरके हॉनकॉन लेजर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड**, श्री. राघव शामराव कुलकर्णी, श्रीमती आरती राघव कुलकर्णी
थकित रक्कम :	दि. ३१.०५.२०१७ रोजीनुसार **रु. १,९२,०९,५३७.५५** (रु. एक कोटी ब्याण्णव लाख नऊ हजार पाचशे सदतीस व पंचावन्न पैसे मात्र) अधिक दि. ०१.०६.२०१७ पासून पुढील व्याज अधिक त्यावरील मूल्य, प्रभार व खर्च.

स्थावर मालमत्तेचे विवरण

१. पुढील विवरणीत जागेचा सर्व तो भाग व भूखंड - औद्योगिक गाळा क्र. २१७, मोजमापित २४०० चौ फूट चटई क्षेत्रफळ, दुसरा मजला, आरसी बिल्डिंग नं. ई -३.
२. पुढील विवरणीत जागेचा सर्व तो भाग व भूखंड - औद्योगिक गाळा क्र. २१८, मोजमापित २४०० चौ फूट चटई क्षेत्रफळ, दुसरा मजला, आरसी बिल्डिंग नं. ई -३.
३. पुढील विवरणीत जागेचा सर्व तो भाग व भूखंड - औद्योगिक गाळा क्र. २१९, मोजमापित २४०० चौ फूट चटई क्षेत्रफळ, दुसरा मजला, आरसी बिल्डिंग नं. ई -३.
४. पुढील विवरणीत जागेचा सर्व तो भाग व भूखंड - औद्योगिक गाळा क्र. २२०, मोजमापित २४०० चौ फूट चटई क्षेत्रफळ, दुसरा मजला, आरसी बिल्डिंग नं. ई -३.

वरील सर्व गाळे हे भूमी वर्ल्ड इंडस्ट्रियल पार्क म्हणून ज्ञात इमारतीतील व सदर इमारत ही सर्व्हे क्र. ५७/२ धारक जमिनीवर निर्मित तसेच तेवढेच क्षेत्रा, गाव पिंपळास, तलाठी साजा - वेहेळे, तालुका भिवंडी व जिल्हा ठाणे, नोंदणीकरण जिल्हा ठाणे व उपजिल्हा भिवंडी. मे. एआरके हॉनकॉन लेजर्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेडच्या मालकीची मालमत्ता, सदर मालमत्ता ही सर्व्हे क्र. ५७/२ धारक, मोजमापित ४४०० चौ. मी. क्षेत्रफळाच्या जमिनीच्या मोठ्या भूखंडाच्या मालमत्तेच्या सर्व त्या भाग व भूखंडावर निर्मित समान क्षेत्रासह, गाव पिंपळास, तलाठी साजा वेहेळे, तालुका भिवंडी व जिल्हा ठाणे, नोंदणीकरण जिल्हा ठाणे व उप जिल्हा भिवंडी येथील, सदर इमारतीअंतर्गत जमिनीतील प्रमाणातील हक्क तसेच

सामायिक क्षेत्र, सुविधा यांचा वापर व प्राप्ती तसेच सद जागेमध्ये उपलब्ध हक्क मार्ग व सुविधाधिकार व उपलब्ध पार्किंग यांसमवेत तसेच सदर जागेशी संबंधित शेअर प्रमाणपत्र व सभासदत्व.

जागेच्या सीमा पुढीलप्रमाणे : उत्तरेस : मोकळी जागा, **पूर्वेस:** मोकळी जागा, **पश्चिमेस:** जिने/लिफ्ट/लॉबी, **दक्षिणेस:** गाळा क्र. २१६.

	राखीव किंमत: युनिट	राखीव किंमत (रु. लाख)		इसारा अनामत रक्कम: युनिट	राखीव किंमत (रु. लाख)
संच १	युनिट क्र. २१७	७८.००	संच १	युनिट क्र. २१७	७.८०
संच २	युनिट क्र. २१८	७८.००	संच २	युनिट क्र. २१८	७.८०
संच ३	युनिट क्र. २१९	७८.००	संच ३	युनिट क्र. २१९	७.८०
संच ४	युनिट क्र. २२०	७८.००	संच ४	युनिट क्र. २२०	७.८०
	एकूण	३१२.००		एकूण	३१.२०

सेरसाई आयडी	युनिट क्र. २१७	सिक्युरिटी इंटरेस्ट आयडी- ४०००१११६२८३२ अ‍ॅसेट आयडी- २०००१११४०६५६
	युनिट क्र. २१८	सिक्युरिटी इंटरेस्ट आयडी- ४०००१११६३०८३ अ‍ॅसेट आयडी- २०००१११४०९०७
	युनिट क्र. २१९	सिक्युरिटी इंटरेस्ट आयडी- ४०००१११६५०७२ अ‍ॅसेट आयडी- २०००१११४२८९६
	युनिट क्र. २२०	सिक्युरिटी इंटरेस्ट आयडी- ४०००१११६५३४६ अ‍ॅसेट आयडी- २०००१११४३१६९
दावे, काही असल्यास, जे मालमत्तेकरिता करण्यात आलेले आहेत तसेच प्रतिभूत धनकोंना ज्ञात अन्य देणी व मूल्य :	**माहित नाही**	
मालमत्तेचे परीक्षण :	**दि. १७.०६.२०२२ रोजी दु. २.०० ते दु. ४.०० या वेळेत. संपर्क क्र. : ९६९९५३४९९९**	
बोली सादरीकरणाची अंतिम तारीख :	**दि. ३०.०६.२०२२ रोजी सायं. ४.०० पर्यंत**	
बोली उघडण्याची तारीख व ठिकाण :	**ई-लिलाव / बोली वेबसाइट (https://sarfaesi.auctiontiger.net) च्या माध्यमातून दि. ०१.०७.२०२२ रोजी स. ११.०० ते दु. १.०० या वेळेत.**	

सदर प्रसिद्धी ही सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत वरील निर्देशित कर्जदार / हमीदारांसाठी तीस दिवसांची सूचना आहे.

ई-लिलावात सहभाग घेण्याकरिता बोली सादर करण्यापूर्वी संबंधित मालमत्तेचा ई-लिलाव / विक्रीच्या विस्तृत अटी व शर्तींकरिता तसेच अन्य तपशिलाकरिता कृपया प्रतिभूत धनकोंची वेबसाइट अर्थात http://www.pegasus-arc.com/asset-to-auction.html वर दिलेली लिंक पाहावी. बोलीदार वेबसाइट https://sarfaesi.auctiontiger.net ला भेट देऊ शकतील किंवा सेवा प्रदाते मे. ई-प्रोक्युअरमेंट टेक्नॉलॉजीस लि., ऑक्शन टायगर, बोलीदारांसाठी सहायता क्र. : ०७९-६८१३६८०५/६८१३६८३७, मोबा. + ९१९९७८५९१८८८, ई-मेल : ramprasad@auctiontiger.net व support@auctiontiger.net येथे संपर्क साधता येईल.

ठिकाण : भिवंडी, ठाणे
दिनांक : २६.०५.२०२२
प्राधिकृत अधिकारी
पीगासस अ‍ॅसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड
(पीगासस ग्रूप थर्टी फोर ट्रस्ट १ चे ट्रस्टी)

जाहीर सूचना

आमचे अशील यांच्या वतीने सूचना याद्वारे देण्यात येते की, श्री. दिनेश हरीलाल पटेल यांचे सर्व हक्क, अधिकार व हितसंबंध खालील लिखीत अनुसूचीमध्ये अधिक विवरणीत जागेमधील त्यांचे हक्क, अधिकार व हितसंबंध खरेदी करण्याचा व ताबा घेण्याकरिता बोलणी करत आहेत.

कोणाही व्यक्तीस अनुसूचीमध्ये अधिक विवरणीत सदर जागा वा कोणत्याही भागाच्या संबंधात कोणतेही हक्क, अधिकार, दावे वा हितसंबंध यांच्या संदर्भात कोणतेही दावे असल्यास तसेच ताबा असल्यास तसेच विक्री, अदलाबदल, गहाण, वारसा, भेट, धारणाधिकार, प्रभार, देखभाल, सुविधाधिकार, न्यास, एचयूएफ, भाडेकरार, वहिवाट, लीव्ह अ‍ॅन्ड लायसंस, करार, खटला, कोणतेही कायदेशी प्रक्रिया वा कोणत्याही अन्य आदेश वा हुकूम जारी जे कोणत्याही न्यायालयाचे असतील, न्यायाधिकरण फोरम वा लवाद वा वसुली प्रक्रिया वा अन्य काही असल्यास त्यांनी याद्वारे लेखी स्वरूपात अधोहस्ताक्षरित यांना सदर तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा सदर दावे वा दावे, काही असल्यास ते अधित्यागीत वा परित्यागीत मानले जातील.

जागेचे विवरण :

कार्यालय क्र. ३०१, मोजमापित अंदाजे ३३१.४४ चौरस फूट बिल्ट अप क्षेत्रफळ पूर्वीचे करार दि. १७ जून, १९९९ अर्थात ३३७.४४ चौ. फूट चटई क्षेत्रफळ असलेल्या प्रत्यक्ष मोजमापणी साईट, तिसरा मजला, बिल्डींग साईया हाउस म्हणून ज्ञात साईया हाउस प्रीमायसेस को-ऑप. सोसायटी लिमिटेड येथील जमिन धारक सीएस क्र. ९१७, पी. पी. क्र. ४०, टीपीएस क्र. ४ येथील मांडवी विभागामधील २७९, नरशी नाथा स्ट्रीट, भात बाझार, मुंबई ४०० ००९ येथील पाच संपूर्ण प्रदानित शेअर्स धारक विभिन्न क्र. १९१ ते १९५ (दोन्ही समाविष्ट) धारक शेअर प्रमाणपत्र क्र. ३९ द्वारे प्रतिनिधीत्व सदर सोसायटीद्वारे.

दि. २५ मे, २०२२
मे. अपेक्स लॉ पार्टनर्सकरिता
सही/-
कैझार मर्चंट
अपेक्स चेंबर्स, ३ रा मजला, ७५,
जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

श्री अधिकारी ब्रदर्स टेलिव्हिजन नेटवर्क लिमिटेड

सीआयएन : एल३२२००एमएच१९९४पीएलसी०८३८५३
नोंदणीकृत कार्यालय : ६ वा मजला, अधिकारी चेंबर्स, ओबेरॉय कॉम्प्लेक्स, न्यू लिंक रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई - ४०० ०५३. दूर. : ०२२ - २६३९५४०० / ०२२ - ४०२३००००
फॅक्स : ०२२ - २६३९५४५९, ई-मेल : investorservices@adhikaribrothers.com, वेबसाइट : www.adhikaribrothers.com

दि. ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेली तिमाही व वर्षाकरिताच्या स्थायी व एकत्रित लेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा अहवाल

रु. लाखांत, ईपीएस वगळता

अ. क्र.	तपशिल	अलिप्त संपलेली तिमाही ३१-मार्च-२२ लेखापरिक्षित	अलिप्त संपलेली तिमाही ३१-मार्च-२१ लेखापरिक्षित	एकत्रित संपलेली तिमाही ३१-मार्च-२२ लेखापरिक्षित	एकत्रित संपलेली तिमाही ३१-मार्च-२१ लेखापरिक्षित	अलिप्त संपलेले वर्ष ३१-मार्च-२२ लेखापरिक्षित	अलिप्त संपलेले वर्ष ३१-मार्च-२१ लेखापरिक्षित	एकत्रित संपलेले वर्ष ३१-मार्च-२२ लेखापरिक्षित	एकत्रित संपलेले वर्ष ३१-मार्च-२१ लेखापरिक्षित
१	परिचालनातून एकूण उत्पन्न (निव्वळ)	-	१.३७	-	१.३७	-	३१.२८	-	३१.२८
२	कालावधीकरिता (कर, अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबीपूर्व) निव्वळ नफा/(तोटा)	(५३०.८६)	(३४८.५६)	(५३०.८६)	(३५०.०३)	(२,१२६.१५)	(२,४८८.२१)	(२,१२६.१५)	(२,४९३.३१)
३	कालावधीकरिता (करपूर्व, अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबीपश्चात) निव्वळ नफा/(तोटा)	(५३०.८६)	(३४८.५६)	(५३०.८६)	(३५०.०३)	(२,१२६.१५)	(२,४८८.२१)	(२,१२६.१५)	(२,४९३.३१)
४	कालावधीकरिता (कर, अपवादात्मक व/वा अतिविशेष बाबीपश्चात) निव्वळ नफा/(तोटा)	(५३०.८६)	(३५३.५०)	(५३०.८६)	(३५४.४८)	(२,१२४.५०)	(२,४९३.१५)	(२,१२४.५०)	(२,४९६.५७)
५	कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता नफा (करपश्चात) व अन्म सर्वसमावेशक उत्पन्न (करपश्चात) यांचा समावेश)	(५३०.७१)	(३५३.२१)	(५३०.७१)	(३५४.१९)	(२,१२४.४५)	(२,४९३.१०)	(२,१२४.४५)	(२,४९६.५१)
६	समभाग भांडवल	३,४९४.४५	३,४९४.४५	३,४९४.४५	३,४९४.४५	३,४९४.४५	३,४९४.४५	३,४९४.४५	३,४९४.४५
७	राखीव (पुनर्मूल्यांकन राखीव वगळता) गत वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदामध्ये दर्शविल्यानुसार	(११,३३२.९७)	(९,२०८.५२)	(११,३३२.९७)	(९,२१३.०९)	(११,३३२.९७)	(९,२०८.५२)	(११,३३२.९७)	(९,२१३.०९)
८	उत्पन्न प्रतिशेअर (प्रत्येकी रु. १०/-)								
	मूलभूत	(१.५२)	(१.०१)	(१.५२)	(१.०२)	(६.०८)	(७.१३)	(६.०८)	(७.१५)
	सौम्यीकृत	(१.५२)	(१.०१)	(१.५२)	(१.०२)	(६.०८)	(७.१३)	(६.०८)	(७.१५)

टीपा :

१. कंपनी राष्ट्रीय कंपनी विधि न्यायाधिकरण (एनसीएलटी) यांच्याकडे दि. २० डिसेंबर, २०१९ रोजी दाखल झाली आहे - आदेश क्र. - सीपी (आयबी) नं. ४३७४/आय अ‍ॅन्ड बी/एमबी/२०१८. आदेशानुसार कंपनी ही ठराव अधिकारी (आरपी) नाव श्री. वीरेंद्र कुमार जैन यांच्याकडे कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रियेअंतर्गत (सीआयआरपी) आहे.
धनकोंच्या समितीने दि. २४ ऑगस्ट, २०२१ रोजी आयोजित सीओसी सभेमध्ये कंपनीच्या परिसमापनास मंजुरी दिली आहे. सदर मंजुरीच्या अनुषंगाने, सन्माननीय एनसीएलटी यांनी आदेश दि. १६ डिसेंब, २०२१ अंतर्गत परिसमापनास मंडुरी दिली व परिसमापक नाव - श्री. आशिष व्यास यांची सुधारा आदेश दि. ०४ जानेवारी, २०२२ अंतर्गत नेमणूक करण्यात आली आहे. सुधारित परिसमापन आदेश अपलोड करण्यात आला होता व दि. २१ जानेवारी, २०२२ रोजी प्राप्त झाला आहे.
बरखास्त व्यवस्थापनाद्वारे सन्मा. एनसीएलटी आदेशाविरोधात अपील दाखल करण्यात आले होते. सदर अपिलाच्या संदर्भात सन्मा. एनसीएलएटी, यांनी त्यांचा आदेश दि. ३१ जानेवारी, २०२२ अंतर्गत परिसमापन प्रक्रियेस अटकाव केला व सदर प्रकरण दि. १४ जुलै, २०२२ रोजी सूचिबद्ध करण्याचे निर्देश दिले. सदर आदेशाच्या अनुषंगाने, ठराव अधिकारी हे दि. ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेली तिमाही व वर्षाकरिताचे अनुपालन करीत आहेत.
२. बरखास्त व्यवस्थापनाने कॉर्पोरेट ऋणकोंद्वारे विनंतीवर कॉर्पोरेट व नोंदणीकृत कार्यालय, कन्टेन्ट लायब्ररी (अमूर्त संपत्ती), वस्तूसूची, अन्य स्थायी संपत्ती, स्थायी संपत्ती, रजिस्टर तसेच अशी अन्य माहिती व नोंदी/ दस्तावेज यांचा ताबा सुपूर्द केलेला नाही. ठराव अधिकाऱ्यांनी आयबीसीच्या अनुच्छेद १९ अंतर्गत कंपनीच्या बरखास्त व्यवस्थापनाविरोधात सन्मा. एनसीएलटी, मुंबई यांच्याकडे अ-सहकारिता याचिका दाखल केली. अ-सहकारिता याचिका दि. ६ ऑक्टोबर, २०२० रोजी सूचिबद्ध झाली. अ-सहकारिता याचिकेवर दीर्घ सुनावणीपश्चात, सन्मा. एनसीएलटी, मुंबई खंडपीठ यांच्याद्वारे एक अंतरिम आदेश जारी करण्यात आला. खंडपीठाने अ‍ॅडव्होकेट निकिता अभ्यंकर यांची खात्यांची विद्यमान पुस्तके, कन्टेन्ट लायब्ररी, नोंदणीकृत कार्यालय, कांदिवली प्लॉट तसेच अन्य संबंधित प्रलंबित माहिती व विनंती यांच्या सुपूर्दतेकरिता आरपी व बरखास्त व्यव्वस्थापन यांच्या संयुक्त सभेच्या वृत्तान्ताची नोंद घेणे तसेच व्हिडीओग्राफी करण्याकरिता व त्याची सन्मा. एनसीएलटी यांच्याकडे नोंद करण्याकरिता कोर्ट निरीक्षक म्हणून नेमणूक केली.
सन्मा. एनसीएलटी यांच्या अंतरिम आदेशापश्चात, नुकतेच गत दोन वित्तीय वर्षांकरिताच्या खाते पुस्तिकांचा मर्यादित प्रवेश पुरविण्यात आला. तथापि, स्थायी संपत्ती रजिस्टर, २०१७-१८ पर्यंतची खाते पुस्तिका तसेच अन्य विविध सहाय्यक दस्तावेज पुरविण्यात आलेले नाहीत. यासंदर्भात आरपी यांनी कोर्ट निरीक्षकांना यापूर्वीच पत्रव्यवहार केलेला आहे. पुढे, कांदिवली प्लॉटची सुपूर्दता पूर्ण करण्यात आली.
बरखास्त व्यवस्थापनाने अजूनही स्थायी संपत्ती रजिस्टर सुपूर्द केलेले नसल्याने मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षाकरिताच्या घसारा रकमेचा सारांश गणन करता आलेला नाही. त्यानुसार मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वर्षाकरिताची घसारा रक्कम ही मार्च, २०२१ रोजी संपलेल्या वर्षाकरिताच्या घसारा रकमेइतकी गृहीत धरली आहे.
३. कंपनीच्या वरील स्थायी वित्तीय निष्कर्षांचे ठराव अधिकारी समितीद्वारे (बरखास्त संचालक मंडळाच्या जागी) दि. २५ मे, २०२२ रोजी आयोजित सभेमध्ये पुनरावलोकन करण्यात आले. वैधानिक लेखापरीक्षकांना दि. ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेली तिमाही व वर्षाकरिताच्या सदर स्थायी वित्तीय निष्कर्षांचे लेखापरीक्षण केले व ते कंपनीची वेबसाइट www.adhikaribrothers.com वर तसेच कंपनीचे शेअर्स सूचिबद्ध असलेली बीएसई लिमिटेडची वेबसाइट www.bseindia.com वर व नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाइट www.nseindia.com येथे उपलब्ध आहे.
४. कंपनी एकच विभाग अर्थात - कंटेन्ट निर्मिती व वितरण विभागात कार्यरत आहे. त्यामुळे नमूद निष्कर्ष हे एकल विभागीय आधारावर आहेत.
५. बँकांकडून घेतलेल्या कंपनीच्या कर्ज सुविधा निष्क्रीय संपत्ती बनल्या आहेत. तथापि, काही बँका अजूनही या पुरविण्यात आलेल्या बँक स्टेटमेंटनुसार, खाते निष्क्रीय संपत्ती बनल्याच्या तारखेपासून व्याज आकारत आहेत. आयबीसीअंतर्गत अधिस्थगनाच्याकारणास्तव सीआयआरपी लागू झाल्यानंतर कोणतेही व्याज प्रभारित करता येत नसल्याने खाते पुस्तिकांमध्ये अशा कोणतीही व्याजाची तरतूद करण्यात आलेली नाही व त्या अनुषंगाने दि. ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिताही नमूद नाही.
६. सन्मा. एनसीएलटी यांच्याकडून प्राप्त आदेशानुसार, मे. एसएबी इव्हेन्ट अ‍ॅन्ड गव्हर्नन्स आता मीडिया लि. व मे. मार्व्हल मीडिया प्रा. लि. यांच्याकडून श्री. रवी अधिकारी व श्री. कैलासनाथ अधिकारी (ठराव अर्जदार) यांच्यासमवेत प्राप्त ठराव आराखडा सीओसी सभासदांच्या विचारांतर्गत आहे. दि. २० मे, २०२० रोजी आयोजित शेवटच्या सीओसी सभेतील चर्चेनुसार, ठराव अर्जदारांनी सुधारित ठराव आराखडा सादर करण्याचे मान्य केले आहे, ज्यावर पुढील सीओसी सभेमध्ये पुन्हा चर्चा होईल. त्यामुळे खातेपुस्तिका या विद्यमान स्थितीच्या आधारावर तयार करण्यात आली आहेत.
७. आरपी यांनी फॉरेन्सिक ऑडिटर नाव - मे. शूभं गुप्ता अ‍ॅन्ड कं. यांच्याद्वारे आयोजित करावयाच्या ५ वर्षे कालावधीकरिताच्या कंपनीची व्यवहारांचे ऑडिट संस्थापित केले आहे. संहितेच्या अनु. ४३, ४५ व ६६ अंतर्गत व्यवहार ऑडिट रिपोर्टमध्ये काही निष्कर्ष, प्राधान्याचे, कमी मूल्याचे व बोगस व्यवहार होते जे कॉर्पोरेट ऋणकोंच्या पूर्वीच्या व्यवस्थापनाने केले होते. त्यानुसार ठराव अधिकाऱ्यांनी, धनकोंच्या समितीच्या मंजुरीसह, सन्मा. एनसीएलटी मुंबई यांच्यासमक्ष आयबीसीच्या अनु. ४, ४५ व ६६ अंतर्गत कंपनीच्या बरखास्त व्यवस्थापनाविरोधात याचिका दाखल केली आहे.
पुढे, सीआयआरपीचा एक भाग म्हणून, ठराव अधिकाऱ्यांनी कंपनीच्या संपत्तीच्या मूल्यांकनासाठी मूल्यांकनकाराची नेमणूक केली आहे. दि. ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या तिमाहीच्या निष्कर्षांमध्ये घोषित स्थायी संपत्ती, मूर्त संपत्ती, वित्तीय संपत्ती व वस्तूसूची यांचे मूल्य हे मूल्यांकनकाराच्या मूल्यांकन अहवालाच्या अधीन आहे.
८. एकूण मुदत कर्जांमध्ये दि. ३१ मार्च, २०२२ रोजी नुसारच्या खातेपुस्तिकांमधील रु. १७८,८५,६७,९५५/- च्या अन्य वित्तीय दायित्व रकमांचा समावेश आहे, तर वित्तीय धनकोंकडून आरपी यांना प्राप्त एकूण दावा रक्कम रु. ५०४,२२,१६,८२८/- (कॉर्पोरेट हमी समाविष्ट) इतकी आहे ज्यामध्ये सीआयआरपी प्रवेश दिनांकापर्यंतचे व्याज/दंड गणन केलेले आहे. रु. ३०१,६७,०८,०५९/- इतक्या रकमेचा दावा करणारी कॉर्पोरेट हमी खाते पुस्तिकांमध्ये पुरविण्यात आलेली नाही.
पुढे, आरपी यांना अन्य धनकोंकडून रु. १३६,०७,९७,२३२/- चे दावे प्राप्त झाले व त्यांनी ते स्वीकारले आहेत, ज्यांचे कंपनीच्या संपत्तीवर प्रतिभूत हितसंबंध आहे तसेच कार्यरत धनको व कर्मचाऱ्यांकडून प्राप्त दावे रु. १८,४९,१८२/- इतके आहे.
९. बरखास्त व्यवस्थापनाने संबंधित बँकांकडून एनओसी प्राप्त केल्याविना वित्तीय वर्ष २०१८-१९ दरम्यान त्यांचे कॉर्पोरेट कार्यालय, अधिकारी चेंबर्सचे १ ला, ४ था, ५ वा, ६ वा व ७ वा मजला संबंधित पक्षकार मे. टीव्ही व्हिजन लिमिटेड व मे. एसएबी इव्हेन्ट्स अ‍ॅन्ड गव्हर्नन्स आता मीडिया लिमिटेड यांना लिव्ह अ‍ॅन्ड लायसेन्सवर दिल. त्यानंतर कंपनीचे खाते बँकांकडे एनपीए म्हणून वर्गीकृत झाले. संबंधित बँकांसमवेत केलेल्या गहाण दस्तावेजांचे हे अनुपालन भंग होते. लिव्ह अ‍ॅन्ड लायसेन्सच्याअटी या संबंधित पार्टीजच्या बाजूने मंजूर करण्यात आल्याअसून कंपनीच्या हिताच्या विरोधात आहेत. ठराव अधिकाऱ्यांनी कंपनीच्या हिताचे रक्षण करण्यासाठी अशी लिव्ह अ‍ॅन्ड लायसेन्स करार खंडित करण्यासाठी दि. १ जुलै, २०२० रोजी लायसेन्सीज्ना स्थगन सूचना जारी केली. त्यानुसार, वरील करारांशी संबंधित परवाना शुल्क जुलै, २०२० पासून महसूल म्हणून खातेपुस्तिकांमध्ये नोंद झालेली नाही.
लायसेन्सीज्ना जारी लिव्ह अ‍ॅन्ड लायसेन्स सूचना खंडित करणे रद्द करण्यासाठी श्री. मार्कंड अधिकाऱ्यांद्वारे सन्मा. एनसीएलटी, मुंबई खंडपीठ यांच्याकडे अर्ज दाखल करण्यात आला आहे. या तारखेनुसार अर्जाचा निष्कर्ष निश्चित करता येणे शक्य नाही.
१०. मार्च, २०२२ व मार्च, २०२१ रोजी संपलेल्या तिमाहीकरिताची आकडेवारी ही संपूर्ण वित्तीय वर्ष तसेच संबंधित वित्तीय वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीपर्यंतची प्रसिद्ध अ-लेखापरीक्षित वर्ष ते तारीख आकडेवारी दरम्यान ताळमेळ साधणारी आहे.
११. ठराव अधिकाऱ्यांचे उपकंपनी - वेस्टविंड रियल्टर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या खातेपुस्तिकांवर कोणतेही नियंत्रण नाही. आरपी यांच्याकडून सातत्याने विनंती करूनही मे. वेस्टविंड रियल्टर्स प्रा. लि.च्या व्यवस्थापनाने एकत्रिकरणाकरिता दि. ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेली तिमाही व कालावधीकरिताचे वित्तीय निष्कर्ष पुरविलेले नाहीत.
१२. आकडेवारी विद्यमान वर्षाच्या लेखा जुळणीकरिता आवश्यकतेनुसार पुन:वर्गवारित/पुनर्रचित/पुन:वर्गीकृत/पुनर्गठित करण्यात आलेली आहे.

श्री अधिकारी ब्रदर्स टेलिव्हिजन नेटवर्क लिमिटेडकरिता
सही/-
वीजेंद्र कुमार जैन
ठराव अधिकारी

ठिकाण : मुंबई
दिनांक : २५ मे, २०२२

आवास फायनान्शियर्स लिमिटेड

Aavas FINANCIERS LTD
SAPNE AAPKE, SAATH HAMAARA

(पूर्वी एयु हाऊसिंग फायनान्स लिमिटेड अशी ज्ञात) (सीआयएन : एल६५९२२आरजे२०११पीएलसीओ३४२९७)
नोंदणी आणि कॉर्पो कार्यालय : २०१-२०२, २ रा मजला, साऊथ एंड स्क्वेअर, मानसरोवर इंडस्ट्रियल एरिया, जयपूर-३०२०२०.

कब्जा सूचना

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकारांनी **आवास फायनान्शियर्स लिमिटेडचे (पूर्वी ''एयू हाऊसिंग फायनान्स लिमिटेड'' अशी ज्ञात)** प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन अ‍ॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अ‍ॅसेटस् अ‍ॅण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स २००२ च्या नियम ९ सहवाचता कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांत संबंधित सूचनेत नमूद केलेली रक्कम प्रदान करण्यासाठी खालील नमूद कर्जदारांना बोलाविण्याकरिता मागणी सूचना जारी केलेली आहे. कर्जदारांनी सदरहू रक्कम प्रदान करण्यास कसूर केलेली आहे म्हणून निम्नस्वाक्षरीकारांनी खालील नमूद तारखेस सदरहू अधिनियमाच्या कलम १३(४) सहवाचता सदरहू नियमावलीच्या नियम ९ अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून येथील खालील वर्णिलेल्या मिळकतीचा कब्जा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार आणि हमीदार आणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावधान करण्यात येते की, सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करू नये आणि सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा कोणताही व्यवहार हा खालील नमूद रक्कम आणि त्यावरील पुढील व्याज या रकमेकरिता **आवास फायनान्शियर्स लिमिटेडच्या (पूर्वी ''एयू हाऊसिंग फायनान्स लिमिटेड'' अशी ज्ञात)** च्या प्रभाराच्या अधीन राहील.

कर्जदाराचे नाव	मागणी सूचनेची तारीख आणि रक्कम	मिळकतीचे वर्णन	कब्जाची तारीख आणि प्रकार
किरण उद्धव खराडे, सौ. आदिती किरण खराडे (खाते क्र.) एलएनपीएव्ही००३१६-१७००४०७९३	२४ नोव्हें. २१ रु. ९७१३७५.४१/- २० नोव्हें. २१ रोजीस थकीत	फ्लॅट क्र. १०८, १ ला मजला, साई कुटीर, घर क्र. ४७९, वालावली, पोस्ट, नावडे, पनवेल, रायगड, महाराष्ट्र **मोजमापित ४०० चौ.फू.**	सांकेतिक कब्जा २३ मे, २०२२ रोजी घेतला
विकास हरीश माडवे, श्री. हरीश मुकुंद माडवे जामीनदार : श्रीमती जयश्री विकास माडवे (खाते क्र.) एलएनबीएसआर००६१७-१८००५८९२७	२० नोव्हें. २१ रु. १३८२३८१.००/- १९ नोव्हें. २१ रोजीस थकीत	घर क्र. २७१ए, २७१बी, गाव बडापोखरणा, तालुका डहाणू, पालघर, महाराष्ट्र **मोजमापित १२५४ चौ.फू.**	सांकेतिक कब्जा २३ मे, २०२२ रोजी घेतला

ठिकाणः जयपूर दिनांकः २६-०५-२०२२ प्राधिकृत अधिकारी आवास फायनान्शियर्स लिमिटेड